आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

१५ मार्च २०२६ - रविवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- २९ राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांमधे व्यावसायिक वापरासाठीच्या एलपीजी सिलेंडर्सचं वितरण राज्य सरकारांमार्फत सुरु

- पीएनजी जोडणी धारकांनी एलपीजी जोडणी परत करावी असं पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू  मंत्रालयाचं आवाहन

- संयुक्त अरब अमिरातीतल्या बंदरांवर हल्ला करण्याचा इराणचा इशारा

- पुद्दुचेरीसह  ४ राज्यातल्या विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम आज जाहीर होणार

**आणि**

- बीसीसीआयचा नमन पुरस्कार प्रदान सोहळा आज नवी दिल्लीत

**<><><><><>**

व्यावसायिक वापरासाठीच्या एलपीजी सिलेंडर्सचं वितरण राज्यसरकारांकडे सोपवलं असून २९ राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांमधे ते सुरु झालं आहे. अशी माहिती पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या सचिव सुजाता शर्मा यांनी काल पत्रकार परिषदेत सांगितलं. एलपीजी सिलेंडरची मागणी ऑनलाईन नोंदवावी, त्याकरता वितरकांच्या आस्थापनांसमोर रांगा लावू नये, असं आवाहन त्यांनी ग्राहकांना केलं.

**<><><><><>**

देशातल्या ज्या घरांमध्ये इंधनासाठी पीएनजी अर्थात पाईप द्वारे नैसर्गिक वायूचा पुरवठा सुरु आहे, त्यांनी एलपीजी सिलिंडर वापरू नयेत आणि पीएनजी वापरणाऱ्या नागरिकांच्या नावावर सिलिंडर जोडण्या असल्यास  त्यांनी त्या परत कराव्यात असं सरकारने म्हटलं आहे.  पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू  मंत्रालयाने काल याबाबतची अधिसूचना जारी केली.  जिथे पाईप गॅस च्या जोडण्या नाहीत

अथवा त्यासाठी काम सुरु आहे, अशा ठिकाणी या जोडण्या देण्याचं काम लवकरात लवकर पूर्ण करण्याचे आदेश मंत्रालयाने दिले आहेत.

जिथे अद्याप पाईप गॅस पोचलेला नाही, तिथे एलपीजी सिलिंडर पुरवठा प्राधान्याने करता यावा यासाठी हा आदेश काढल्याचं मंत्रालयाने म्हटलं आहे.

पश्चिम आशियातल्या संघर्षाचा इंधन आयातीवर विपरीत परिणाम झाला आहे. त्यामुळे देशांतर्गत उत्पादित होणाऱ्या वायूचा वापर अधिक कार्यक्षम रीतीने करण्यासाठी सरकारचे प्रयत्न सुरु आहेत.

<><><><><>

भारताचा ध्वज असलेल्या 'शिवालिक' आणि 'नंदा देवी' या दोन एलपीजीवाहू जहाजांनी काल 'होर्मुझची सामुद्रधुनी' सुरक्षितपणे पार केली. ही जहाज आज मुंद्रा आणि कांडला बंदरांवर पोहोचतील. ९२ हजार७०० टन एलपीजी त्यातून आणला जात आहे. भारताच्या आणखी २२ जहाजांचा  मार्ग मोकळा करण्याकरता प्रयत्न चालू असल्याचं   नौवहन  मंत्रालयाचे विशेष सचिव राजेश कुमार सिन्हा यांनी काल नवी दिल्ली इथे आयोजित आंतर-मंत्रालयीन पत्रकार परिषदेत सांगितलं.

<><><><><>

इराणवर क्षेपणास्त्र डागण्यासाठी संयुक्त अरब अमिराती जागा उपलब्ध करुन देत असल्याचा आरोप इराण ने केला आहे. इराणच्या खार्ग बेटावर आणि अबु मुसा शहरावर काल दुबईजवळच्या रास अल खैमा इथून  क्षेपणास्त्र हल्ले  झाल्याचा दावा इराणचे परराष्ट्र व्यवहार मंत्री सय्यद अब्बास अराघची यांनी केला आहे. संयुक्त अरब अमिरातीतल्या रहिवाशांनी जेबेल अली, खलिफा आणि फुजैरा ही बंदरं तात्काळ रिकामी करावी असा इशारा इराणने जारी केला आहे. या बंदरांमधे अमेरिकेचे लष्करी तळ असून प्रत्युत्तरात त्यांचं नुकसान होण्याची शक्यता असल्याचं इराणने म्हटलं आहे. मात्र अराघची यांचे आरोप युएईने फेटाळले आहेत. संवाद आणि वाटाघाटींनी संघर्ष सोडवण्यावर युएईचा विश्वास आहे आणि

कोणत्याही प्रकारच्या हल्ल्यांना आपल्या भूभागावरुन परवानगी नसते असं युएईचे अध्यक्षीय सल्लागार अनवर गर्गश यांनी म्हटलं आहे. दरम्यान इराणकडून आज एक क्षेपणास्त्र हल्ला झाल्याचं युएईने म्हटलं आहे.

होर्मुझच्या आखातात मित्रदेश युद्धनौका पाठवतील अशी अपेक्षा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी व्यक्त केली आहे.

दरम्यान इस्त्राएलने लेबनॉनने केलेल्या हल्ल्यात सुमारे ८०० जणांचा मृत्यू झाला, तर साडेआठ लाखापेक्षा जास्त विस्थापित झाले आहेत.

<><><><><>

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ सीबीएसई ने पश्चिम आशिया भागात उद्यापासून सुरु होणारी बारावीची परीक्षा रद्द केली आहे. याआधी १ मार्च ते ९ मार्चदरम्यान होणाऱ्या परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या होत्या, परंतु त्याही रद्द केल्याची घोषणा सीबीएसई ने केली आहे. पश्चिम आशिया भागातल्या बारावीच्या विद्यार्थ्यांचे निकाल घोषित करण्याच्या प्रक्रियेबद्दल पुढील काळात माहिती देण्यात येईल असं मंडळाने म्हटलं आहे.

<><><><><>

केंद्रीय निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार आज संध्याकाळी नवी दिल्ली इथं पत्रकार परिषद घेणार आहेत. आसाम तमिळनाडू केरळ पश्चिम बंगाल आणि पुद्दुचेरीच्या विधानसभा निवडणुकांचा कार्यक्रम ते जाहीर करण्याची शक्यता आहे. या पाचही ठिकाणच्या मतदार याद्यांच्या सखोल पुनरिक्षणानंतर अंतिम मतदार याद्या निवडणूक आयोगाने प्रसिद्ध केल्या आहेत.

<><><><><>

नवी दिल्लीत आयोजित केलेल्या तीन दिवसीय कृषी अन्न प्रणाली जागतिक परिषदेची काल सांगता झाली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी या परिषदेचं उद्घाटन केलं होतं. कृषी क्षेत्रात सर्वसमावेश नवोपक्रमांना चालना देणं हे या परिषदेचं

उद्दिष्ट होतं. या परिषदेत १८ देशातले शास्त्रज्ञ, धोरणकर्ते एकत्र आले, महिलांचं कृषी क्षेत्रातलं नेतृत्व सक्षम करण्यासाठी त्यांनी शिफारशी सुचवल्याचं कृषी मंत्रालयाने म्हटलं आहे. या परिषदेत यशस्वी महिला शेतकऱ्यांना पुरस्कार देऊन गौरवण्यात आलं.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आजपासून सुरू होणाऱ्या 'माय भारत बजेट क्वेस्ट २०२६' स्पर्धेतल्या विजेत्यांशी - संवाद साधणार आहेत. केंद्रीय अर्थसंकल्पावर चर्चा करण्याकरता आणि 'विकसित भारत' घडवण्याबाबत दृष्टिकोन मांडण्याकरता युवकांना प्रोत्साहन देणारा हा उपक्रम आहे.. यामधून 'युवा शक्ती'ला—प्रशासन आणि आर्थिक नियोजनामध्ये सामावून घेण्यावर भर देण्यात आला आहे. या उपक्रमाचा उद्देश तरुण 'अमृत पिढीची धोरण-निर्मितीमधील भूमिका बळकट करून २०२७ पर्यंत 'आत्मनिर्भर - विकसित भारत' घडवण्यात त्यांचं योगदान सुनिश्चित करणे असाही आहे. 'माय भारत बजेट क्वेस्ट २०२६' मध्ये १२ लाखांहून अधिक तरुण सहभागी झाले आणि त्यांनी ४७ हजार निबंध सादर केले.

<><><><><>

आसाममधे २ हजार ९२ कोटींच्या आरोग्य प्रकल्पांचं उद्घाटन आणि पायाभरणी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते आज झाली. आसामच्या आरोग्य व्यवस्थेची स्थिती अनेक वर्षं अतिशय वाईट होती, आता आसाममधे वैद्यकीय महाविद्यालयं, रुग्णालयांची निर्मिती झाली आहे,

**होल्ड बाईट शहा**

गुवाहाटी इथल्या  प्रागज्योतिषपूर वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयाचा यात समावेश आहे. गोलाघाट आणि तिनसुकीया इथल्या दोन कॅन्सर सेंटरचं उद्घाटन शहा यांनी दूरस्थ पद्धतीने केलं. याशिवाय दिफू, जोरहाट आणि बारपेटा इथल्या वैद्यकीय महाविद्यालयांचं उद्घाटन शहा यांनी दूरस्थ पद्धतीने केलं.

<><><><>

पश्चिम आशियातल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर परकीय गुंतवणुकदारांनी भारतीय शेअर बाजारातून मार्च महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यात ५२ हजार ७०४ कोटी रुपये काढून घेतले. रुपयाचं अवमूल्यन, कच्च्या तेलाचे दर वाढल्यामुळे अर्थव्यवस्थेच्या वाढीवर होणारा आणि भांडवली उत्पन्नावर होणारा परिणाम ही भारताच्या दृष्टीने चिंतेची बाब असल्याचं सांगितलं जात आहे. फेब्रुवारी महिन्यात भारतीय बाजारात २२ हजार ६१५ कोटींची परकीय गुंतवणूक झाली होती. ही गेल्या सतरा महिन्यातली सर्वात मोठी गुंतवणूक होती. त्याआधीचे सलग तीन महिने परकीय गुंतवणूकदारांनी भारतीय बाजारातून गुंतवणूक काढून घेतली होती. जानेवारी महिन्यात ३५ हजार ९६२ कोटी, डिसेंबर २०२५ मधे २२ हजार ६११ कोटी आणि नोव्हेंबर २०२५ मधे ३ हजार ७६५ कोटी रुपये काढल्याचं डिपॉझिटरीच्या आकडेवारीत म्हटलं आहे. त्यानंतर चालू महिन्यात पुन्हा एकदा परकीय गुंतवणूकादारांनी ५२ हजार कोटींहून अधिक रक्कम भारतीय बाजारातून काढून  घेतली आहे.

<><><><>

भारतीय क्रिकेट नियामक मंडळ BCCI चा  'नमन पुरस्कार ' सोहळा आज नवी दिल्लीत होणार आहे. दिग्गज खेळाडू रॉजर बिन्नी आणि राहुल द्रविड यांना 'कर्नल सी. के. नायडू जीवनगौरव पुरस्कारा' ने  गौरवण्यात येईल. भारतीय महिला क्रिकेट संघाची माजी कर्णधार मिताली राज हिला, 'BCCI महिला जीवनगौरव पुरस्कारा'ने सन्मानित केलं जाईल.

२०२४-२५ या क्रिकेट हंगामातल्या उत्कृष्ट कामगिरीसाठीचे पुरस्कारही या शानदार सोहळ्यात प्रदान करण्यात येतील. सर्वोत्कृष्ट आंतरराष्ट्रीय खेळाडू म्हणून शुभमन गिल आणि स्मृती मानधना यांचा गौरव होईल. सर्वोत्कृष्ट देशांतर्गत खेळाडूचा मान  आयुष म्हात्रे आणि इरा जाधव या मुंबईकरांनी पटकावला आहे. देशांतर्गत क्रिकेट स्पर्धांच्या आयोजनासाठीचा पुरस्कार मुंबई क्रिकेट संघटनेला मिळाला आहे.

<><><><><>

एफआयएच महिला हॉकी विश्वचषक पात्रता स्पर्धेच्या अंतिम फेरीत भारतीय संघाला काल इंग्लंडकडून ०-२ असा पराभव पत्करावा लागला. मात्र भारताचा विश्वचषक स्पर्धेततला प्रवेश आधीच निश्चित झाला आहे. इंग्लंड आणि स्कॉटलंड हे संघही विश्वचषकासाठी पात्र ठरले आहेत.

//<><><><><>//